भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७५१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/११/२०१७

**१) सोन्याच्या गळसुलीची व नगदी पैशाची चोरी. :–**

दिनांक ०६/११/२०१७ चे १२.०० ते १६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी बाळा श्यामराव शस्त्रबुधे वय ६० वर्ष रा. अडयाळ यांचे अडयाळ होळी चौक येथील घरी कोणीही हजर नसतांना कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन घराच्या समोरील दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून भिंतीला असलेल्या आलमारी व टिनाचे पेटी मधुन १ कारल्या मण्याची सोन्याची गरसुली १० ग्रॅम, व नगदी ५,५००/–रुपये असा एकुण २५,५००/–रुपया चा माल चोरून नेला. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४५४,३८० भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहे. आहेत.

**२) मोटारपंपची चोरी. :–**

दिनांक २८/१०/२०१७ चे १६.०० ते २९/१०/२०१७ चे ०५.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी यशवंत मारोती पटले वय ७० वर्ष रा. झारली याचे झारली येथील शेतातील विहीरी मध्ये लावलेली सि.आर.झेड १.५ एचपीची मोटारपंप किंमत ५०००/–रुपयाची ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेली. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. कळंबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) महीलेस अश्लिल शब्दात शिविगाळ करून, मारपीट करून, जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ५/११/२०१७ चे २२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही तीच्या घराच्या छपरीत झोपली असतांना आरोपी हा फिर्यादीच्या घरासमोर ऊभा राहुन गावक–या सोबत बोलत होता. तेव्हा फिर्यादीच्या पतीने " तु धरणाचे पाणी आपले शेतात नेला. तेव्हा आमचे बाजुचे शेतातील खांड बांधले नाही. त्यामुळे माझ्या धानाच्या कडपा ओल्या होवुन नुकसान झाले." असे हटकले असता तेव्हा आरोपीने फिर्यादीच्या अंगणात अनाधीकृतपने प्रवेश करून फिर्यादीच्या पतीला शिवीगाळ करीत असता फिर्यादीने शिवीगाळ का करता ? असे हटकले असता आरोपीने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून तीचे छपरीत जावुन तीला लाथा बुक्यांनी मारपीट केली व डावा हात मुरकटुन जिवाने मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४४८,२९४,३२३,५०६ भादंवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. तांडेकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**४) लोखंडी धारदार वस्तुने पोटावर व हाताचे कोहणीवर मारून जखमी केले. :—**

दिनांक ६/११/२०१७ चे ९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी शिशुपाल सुकंद बिरणवार वय ४२ वर्ष रा. ब्राम्हणटोला हा त्याचे सायकलने गावी जात असतांना यातील आरोपीने त्याचे मोटार सायकलने फिर्यादी जवळ येवुन फिर्यादीस सायकल वरून खाली पाडुन आपले जवळील लोखंडी धारदार वस्तुने महालगाव फाटा येथे फिर्यादीच्या पोटावर व हाताचे कोहणीवर मारून जखमी केले. अशा फिर्यादीच्या तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**५) सार्वजनीक ठिकाणी वाहन उभी करून वाहतुकीस अडथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ६/११/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मारोती व्हॅन वाहन हे जवाहरनगर ते पेट्रोल पंप ठाणा कडे जाणा—या येणा—या रोडवर पुला खाली ऊभी ठेवुन वाहतुकीस अडथडा निर्माण केला. अशा सर तर्फे फिर्यादी पो.हवा. रामटेके पो.स्टे. जवाहरनगर यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन जवाहनगर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. रामटेके पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**६) ट्रॅक्टरची सायकला धडक , अपघातात चिमुकल्याचा मृत्यु .:—**

दिनांक ६/११/२०१७ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी ट्रॅक्टर चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मृतक अनुराग भैयालाल पटले रा. डोंगरला याचे सायकलला डोंगरला टोली येथे धडक मारून त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी मनोहर भिवाजी खरवडे वय ५२ वर्ष रा. डोंगरला यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३०४(अ) भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. दुगावकर पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. **गुन्हयातील आरोपीला अटक करण्यात आली.**

**७) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी.:—**

दिनांक ६/११/२०१७ चे ११.१५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी राखडु सखाराम काळसर्पे वय ६५ वर्ष रा. आलेसुर व त्याचा मुलगा जखमी अनिल काळसर्पे हे आपल्या मोटार सायकल क्र. एम.एच. ३७ सी ५८५० ने तुमसर कडे येत असतांना विरूध्द दिशेने येणा—या यातील आरोपी वेगो मोटार सायकल चालकाने त्याच्या जवळील वाहन भरधाव वेगाने ,लापरवाहीने चालवुन आमोरा—समोर मिटेवानी डांबरी रोड येथे धडक दिल्याने फिर्यादीचा जखमी मुलगा व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाला. अशा फिर्यादीच्या तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७ भा.दं.वी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**८) अज्ञात चारचाकी वाहनाची मोटार सायकला धडक, २ गंभिर जखमी.:—**

दिनांक ५/११/२०१७ चे १९.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी जखमी सुखदेव नामदेव सरोते वय ४५ वर्ष रा. पाहुणगाव हे त्यांचे जवळील बजाज डिक्सकव्हर कंपनीची मोटार सायकल क्र.

एमएच ३६ आर ३१२१ ने अविनाश बाजीराव कोरे वय ३५ वर्ष रा. पाहुणगाव यांचे सोबत लाखांदुर ते पवनी रोडने जात असतांना विरूध्द दिशेने येणा–या आरोपी चारचाकी वाहन चालकाने त्याचे जवळील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मोटार सायकला पाहुणगाव येथे धडक दिल्याने मोटार सायकल चालक व अविनाश कोरे यांना गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी बयान व डॉक्टर मेमो वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३७,३३८ भा.दं.वी. सहकलम १८४/१७७,१३४(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. उईके पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**९) मोटार सायकलच्या धडकेने, ४ गंभिर जखमी.:–**

दिनांक ६/११/२०१७ चे १८.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ज्ञानेश्वर गजानन ढोरे वय ३० वर्ष रा. करांडला व त्याचे ४ साथीदार क्रमांक १) सुधाकर तोंडरे वय ५० वर्ष २) नामदेव मेश्राम वय ५५ वर्ष ३) क्रिष्णा मधुकर नाकतोडे वय ३२ वर्ष ४) हरी अलोणे वय ५५ वर्ष सर्व रा. करांडला हे शेतामधुन धान कापणीचे काम करून घराकडे पायी रोडाने जात असता यातील आरोपी बजाज डिस्कव्हर मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालुवन करांडला येथे मागेहुन धडक दिल्याने फिर्यादीसह चारही साथिदारांना गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाला. अशा फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३७,३३८ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. उईके पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. **गुन्हयातील आरोपीला अटक करण्यात आली.**

**१०) ट्रकच्या धडकेत, ३ जखमी.:–**

दिनांक ६/११/२०१७ चे ३.१५ ते ३.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी अंग्रेजसिंग कश्मीरसिंग बल वय ३५ वर्ष राहणार– पठाण चाळ मश्जिद हनुमान नगर पार्क साईड विकोलीक मुंबई हा त्याचे ट्रक क्र. एम.एच ०४ डी. ६५७७ ने मुंबई वरून रायपुर कडे एन.एच ६ रोडने जात असता समोरून येणा–या यातील आरोपी ट्रक चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन आपली साईड सोडुन फिर्यादीच्या ट्रक ला भारत पेट्रोलपंप समोर तहसिल कार्यालय भंडारा येथे धडक मारून फिर्यादी व स्वत: व त्याचा साथीदार यास जखमी करण्यास कारणीभुत झाला. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.पो.नि गभणे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**११) विषारी सापाने द्वंश केल्याने उपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु.:–**

दिनांक २१/९/२०१७ चे ९.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. निता युवराज हाडगे वय ३२ वर्ष रा. देवनारा ही तीच्या शेतात काम करीत असतांना सापाने चावा घेतल्याने तीला औषधोपचारा करीता खाजगी दवाखाना देवनारा येथे नेले होते. परंतु प्रकृती बरी न झाल्याने दि. २९/०९/२०१७ ला ०५.०० वा दरम्यान तीला लता मंगेशकर हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता ती उपचारा दरम्यान दिनांक ०१/१०/२०१७ ला मरण पावल्याने पो.स्टे. एम.आय.डी.सी. नागपुर येथे मर्ग क्र.